# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:16.05.2026** **वार: शनिवार**

1. नाफेड राज्यात 12 रुपये 35 पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार असल्याची केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची घोषणा
2. येत्या पाच वर्षात राज्यातील प्रत्येक बेघराला पक्क घर देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही,
3. वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट यूजी परीक्षा आता येत्या 21 जून रोजी होणार,
4. ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ आणि लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या पार्थिव देहावर ठाणे इथं अंत्यसंस्कार आणि
5. नैऋत्य मोसमी पाऊस यंदा 26 मे च्या दरम्यान केरळममध्ये दाखल होण्याचा अंदाज

**शिवराजसिंह चौहान-मुख्यमंत्री-सातारा**

नाफेड राज्यात 12 रुपये 35 पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल साताऱ्यात केली. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजने अंतर्गत 5 लाख घरांच्या लोकार्पण समारंभात ते काल बोलत होते. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात 6 लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. यावेळी बोलताना चौहान म्हणाले...

**अभी प्याज के दामों के बारे में देवन जी का भी फोन आया था हम लोगों ने आपस में बात की प्याज का उत्पादन बंपर हो गया। बांग्लादेश हमारी प्याज जा नहीं पा रही ये पश्चिम आशिया मिडल ईस्ट के संकट के कारण प्याज मिडल ईस्ट के देशों में जाती थी भाभी नहीं जा पा रही इसलिए प्याज के रेट गिर गए। प्याज उत्पादक किसान बहनों और भाइयों आज से ही प्याज की खरीदी ₹12.35 किलो शुरू करेगा।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांना पक्की घरे' या स्वप्नाच्या पूर्तीसाठी अहोरात्र काम करुन येत्या पाच वर्षात राज्यातील प्रत्येक बेघराला पक्क घर देऊ', अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. '30 जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानही देण्यात येईल', अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. सातारा पालिकेने उभारलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरणही काल शिवराजसिंह चौहान आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं.

**दरवाढ**

जागतिक स्तरावर झालेल्या इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांनी वाढ केली आहे. दिल्ली आणि मुंबईत सीएनजीच्या दरातही प्रतिकिलो 2 रुपये वाढ झाली आहे. विमानाच्या इंधनावर आकारल्या जाणाऱ्या व्हॅटमध्ये राज्य शासनानं कपात केली असून आता 18 टक्क्यांऐवजी 7 टक्के कर आकारला जाईल. हा दर येत्या 14 नोव्हेंबर पर्यंत लागू राहील.

**नीट परीक्षा**

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट यूजी 2026 ही परीक्षा येत्या 21 जून रोजी पुन्हा घेतली जाणार असल्याचं राष्ट्रीय परिक्षा संस्था अर्थात एन टी ए नं काल जाहीर केलं. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणतही शुल्क भरावं लागणार नसून 15

मिनिटे अतिरीक्त वेळ दिला जाईल, असंही प्रधान यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत जाहीर केलं. नीट-यूजी परीक्षा पुढील वर्षापासून संगणक आधारित अर्थात सीबीटी पद्धतीनं घेतली जाणार आहे.

**चौकशी**

नीट पेपरफुटी प्रकरणी तपास करणाऱ्या सीबीआयने काल लातूर इथल्या एका खासगी प्रशिक्षण केंद्र संचालकांची चौकशी केली. शिवराज मोटेगावकर असं या केंद्र संचालकाचं नाव आहे. दोन दिवसापूर्वी सीबीआयच्या पथकानं लातूरमधल्या एका सेवानिवृत्त प्राध्यापकालाही ताब्यात घेतलं होतं.

**टेट**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा आता 21 जूनऐवजी 28 जून रोजी घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात NTA कडून त्याच दिवशी नीट परीक्षा आयोजित करण्यात आल्याने केंद्रांवरील ताण टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**पंतप्रधान-नेदरलँड्स**

पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या पाच देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यासाठी काल नेदरलँड्समध्ये दाखल झाले. या दौऱ्यादरम्यान, पंतप्रधान मोदी डच पंतप्रधान रॉब जेटेन यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील तसंच तिथले राजे आणि राणी यांची भेट घेतील. ते आज भारतीय समुदायाला संबोधित करतील तसंच आघाडीच्या डच कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेतील.या दौऱ्यात विशेषतः सेमीकंडक्टर चिप्स आणि एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वाचे करार होण्याची शक्यता आहे. व्यापाराच्या दृष्टिकोनातून, नेदरलँड्स हा भारताचा प्रमुख आर्थिक भागीदार आहे. तत्पूर्वी दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यामध्ये पंतप्रधानांनी संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन झायद यांची भेट घेतली, या भेटीत ऊर्जा, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करार झाले. संयुक्त अरब अमिरातीवरील अलीकडील हल्ल्यांचा मोदी यांनी तीव्र शब्दांत निषेध केला.

**नाडकर्णी**

ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ आणि लेखक डॉ.आनंद नाडकर्णी यांचं काल मुंबईतल्या एका रुग्णालयात दीर्घ आजारानं निधन झालं. ते 67 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर काल दुपारी ठाण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. आनंद नाडकर्णी यांनी व्यसनमुक्ती, तरुण आणि किशोरांची जडणघडण या क्षेत्रात त्यांनी जनजागृतीचं भरीव कार्य केलं. मानसिक आरोग्याविषयी जनमानसात जागरूकता निर्माण करण्याचं मोठं काम डॉक्टर नाडकर्णी यांनी केलं. डॉक्टर नाडकर्णी यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून शोक व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. नाडकर्णी यांच्याबरोबर काम केलेल्या त्यांच्या स्नेही आणि ज्येष्ठ लेखिका दीपा देशमुख यांनी आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या.....

**खरं तर आजकाळी जेव्हा कळालं की डॉक्टर आनंद नाडकर्णी आपल्यामधून गेलेत, सुन्नपणा आला मनाला. खरं तर हे पुन्हा एकाचं वैयक्तिक नुकसान झालं. नसून सामाजिक सांस्कृतिक आणि मानसिक आरोग्य या क्षेत्रातलं न भरून येणारं असं नुकसान आहे हे. आनंद चित्रपटाचा नायक हा काल्पनिक होता पण इथं मी अनुभवलेला आनंद खरोखरच नावाप्रमाणेच जगणारा होता. चार मेला आम्ही त्यांच्या शस्त्रक्रिये आधी ठाण्यात जेव्हा गेलो, त्यावेळेस शस्त्रक्रियेनंतरचं वर्षभराचं नियोजन सांगितलं होतं. ही भेट शेवटची ठरेल असं वाटलंच नाही. डॉक्टरांची भावलेली गोष्ट म्हणजे त्यांच्या तोंडून मी कधीही नकारात्मक विचार ऐकला नाही. कोणाविषयी कधी वावगा शब्द त्यांनी काढला नाही. नाटक, सिनेमा, संगीत, साहित्य, चित्र, शिल्प एक माणूस इतकं काम कसं करू शकतो. त्यांची सर्जनशील त्यांच्या मनात इतरांविषयी असलेली एम्पथी आणि सगळ्या वयोगटासाठी त्यांनी आखलेले उपक्रम, एक निखळ आणि स्वच्छ मैत्री करणारा आजच्या जगात असा मित्र मिळणं दुर्मिळ म्हणजे खरं सांगू का वारकरी संप्रदायात जसं माऊली या संबोधनाला महत्त्व आहे. आम्हा**

**साऱ्यांची तो माऊलीच होता असं म्हणावं लागेल म्हणजे असा मित्र आज अचानक गेलाय म्हणजे पोरकं झाल्याची भावना मनात घर करती आहे.**

**गडकरी**

साखर कारखानदारांनी साखर उत्पादनावर भर न देता इथेनॉल निर्मिती वाढवणे गरजेचं आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. वाई तालुक्यातील भुईंज इथं किसनवीर कारखान्याच्या वतीनं जाहीर केलेला देशभक्त आबासाहेब वीर कृतज्ञता पुरस्कार स्विकारल्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**ॲग्रीहॅकॅथॉन**

पुणे हे विद्येचं माहेरघर तर आहेच, पण ॲग्री हॅकॅथॉनच्या यशस्वी आयोजनातून पुण्याला कृषी तंत्रज्ञानाचं केंद्र म्हणून ओळखलं जात आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल केलं. पुण्याच्या कृषी महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या ॲग्री हॅकॅथॉनच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या वर्षी विविध राज्यातील 1 हजार 300 स्पर्धकांनी आपल्या नवकल्पना सादर केल्या असून महाराष्ट्रातून 867 स्पर्धकांनी या हॅकॅथॉनमध्ये भाग घेतला आहे.

**मॉन्सून**

यंदा केरळमध्ये नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन 26 मे च्या दरम्यान होईल, असा अंदाज हवामानखात्यानं काल वर्तवला आहे. साधारणपणे नैऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये एक जूनच्या दरम्यान पोचतो, गेल्यावर्षी मात्र तो 24 मे च्या दरम्यान केरळात दाखल झाला होता. यंदाही तो दरवर्षीपेक्षा लवकर केरळात पोचेल, असं हवामानखात्यानं म्हटलं आहे.

**हवामान**

राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची आणि तुरळक पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील तर विदर्भात हवामान कोरडे असेल आणि तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.